# ७. अपयशाचे व्यवस्थापन (Failure Management)

यश व अपयश ह्या एकाच नाण्याच्या २ बाजू आहेत. अपयशाला प्रत्येक जण घाबरतो कारण या ७ अक्षरांमध्ये माणसाला नाऊमेद करण्याची शक्ती आहे. काय विश्वास बसत नाही ? मग बघाच तर .

**F: Frustration** निराशा , विफलता
**A: Agony** वेदना , दुःख
**I: Insults** अपमान
**L: Loss of initiative** प्रेरणाशक्ती नाहीशी होणे
**U: inputs** अधिक श्रम आवश्यक
**R: Restless feeling** अस्वस्थ मन
**E: Energy loss** शक्ती पात.

अपयश आले की ही वरील सर्व भोग वाटयाला येतात म्हणून प्रत्येकजण अपयशाला घाबरतो. खरेतर अपयश ही यशाची पहिली पायरी असते असे सांगणे सोपे असते पण ज्याच्या वंशा जावे त्यालाच कळे.

माझ्या मते अपयशाचे प्रकार आहेत. खरे अपयश किंवा उचित परिणाम साध्य नाही म्हणून वाटणारे अपयश. उ.दा.२ मुलगे १0 वी च्या परिक्षाला बसतात. एक नापास होतो. दुस-याला ८६% मार्क मिळतात पण ज्या कॉलेजात प्रवेश हवा होता त्या कॉलेजात प्रवेश मिळत नाही. त्यामुळे दुःख होते.
दोघांच्याही मनात अपयशाचीच भावना. अपयशाचे मूल्यामापन नीट केले नाही तर संपूर्ण आयुष्य उधळून जाईल.

आपण आता अपयशाचा अर्थ लावू या !

१. अपयशाचा अर्थ पराभव नसून तुम्ही जिंकला नाहीत एवढाच आहे.

२. अपयश म्हणजे तुम्ही काहीच शिकला नाहीत असा नाही तर तुम्ही काहीतरी शिकलात.

३. अपयश म्हणजे तुमची मानहानी नव्हे तर तुमची प्रयत्न करण्याची तयारी आहे.

४. अपयश म्हणजे तुम्ही प्रयत्न केला नाहीत असा नसून तुम्ही वेगळया प्रकारे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

५. अपयश म्हणजे तुम्ही कमी किंवा कनिष्ट आहात असा नसून तुम्ही **Perfect** नाही एवढाच आहे.

६. अपयश म्हणजे तुम्ही आयुष्य फुकट घालविलेत असा नसून आयुष्याकडे नवीन दृष्टीने बघण्याची गरज आहे.

७. अपयश म्हणजे तुम्ही प्रयत्न सोडून द्या असा अर्थ नसून आता तुम्हाला जास्त प्रयत्न करणे गरजेचे आहे.

८. अपयश म्हणजे तुम्हाला कधीच यश मिळणार नाही असा नसून यश मिळायला तुम्हाला अधिक वेळ लागेल असा आहे.

१0. अपयश म्हणजे देवाने तुम्हाला झिडकारले असा नसुन देवाच्या मनात तुमच्यासाठी काही चांगली योजना आहे.

हे सर्व वाचून जर अपयशी माणसाच्या मनात जिंकण्याची , संकटाचा मुकाबला करण्याची जिद्द निर्माण झाली तर मला वाटते कि ह्या लेखाचे मोल होईल.